# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२२

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - २०

---

### शासनाच्या "एक व्यक्ती एक घर" योजनेबाबत

**(१) ४३० (१८-०३-२०२०) श्री.निलय नाईक :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या मंत्रिमंडळाने "एक व्यक्ती एक घर" या धोरणाला माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान मंजुरी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आतापर्यंत शासकीय योजनेतून किती सदनिका वाटप करण्यात आल्या आहेत तसेच "एक व्यक्ती एक घर" ही संकल्पना कोणत्यास्तरावर राबविण्यात आली असून शासनाने एकाच व्यक्तीचे नावे एकापेक्षा जास्त घरे असतील तर त्यासंदर्भात त्वरित निर्णय घेवून कोणत्या प्रकारची कारवाई केली वा करण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१६-११-२०२२) :** (१), (२) व (३) मा.उच्च न्यायालयामध्ये दाखल करण्यात आलेली फौजदारी जनहित याचिका क्र.३८/२०१८ मध्ये मा.उच्च न्यायालयाने दिनांक १९/१०/२०१८ रोजी पारीत केलेल्या न्यायनिर्णयाला/आदेशाला अनुसरून संपूर्ण राज्यामध्ये एखाद्या व्यक्तीच्या किंवा त्याच्या कुटूंबियाच्या नावे कोणत्याही शासकीय योजनेतील मालकी हक्काचे घर/सदनिका असल्यास त्याला अथवा त्याच्या कुटूंबियांना शासनाच्या त्या किंवा अन्य कोणत्याही योजनेत घर/सदनिका वाटप/वितरीत करण्यास प्रतिबंध करण्याबाबतचे धोरण, राज्य मंत्रिमंडळाने दिनांक ०९/०९/२०१९ च्या मंत्रिमंडळ बैठकीत घेतलेल्या निर्णयास अनुसरून या विभागाच्या दिनांक ११/०९/२०१९ च्या शासन निर्णयान्वये जाहीर करण्यात आले आहे.

सदरहू धोरण राज्यातील सर्व संबंधित प्रशासकीय विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील संबंधित प्राधिकरणे/स्थानिक स्वराज्य संस्था इत्यादींना लागू आहे. ग्रामविकास विभाग, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग तसेच नगरविकास विभाग वगळून, अन्य विभागांकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार, सदरहू धोरण लागू केल्यापासून कोणत्याही शासकीय गृहनिर्माण योजनेंतर्गत मोफत किंवा सवलतीच्या दरात घर/सदनिका प्राप्त केलेल्या कुठल्याही लाभार्थीस नव्याने सदनिका वाटप झाल्याचे उघडकीस आलेले नाही.

---

## कृषि पंपाचे नवीन विद्युत जोडणीसाठी महावितरणकडे कोणतेही योजना नसल्याबाबत

**(२) ९९४ (१८-०३-२०२०) डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.बाळाराम पाटील, श्री.विक्रम काळे, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृषि पंपाच्या नवीन विद्युत जोडणीसाठी महावितरणकडे कोणतीही योजना नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवीन विद्युत जोडणीसाठी पोलचा तसेच ट्रान्सफॉर्मरचा खर्च हे शेतकरी स्वत: करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांकरीता कृषि पंपाची शासकीय योजना देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२३-११-२०२२) :** (१) हे खरे नाही.

कृषि पंपाच्या नवीन विद्युत जोडणीसाठी महावितरणतर्फे जिल्हा वार्षिक योजना, उच्चदाब वितरण प्रणाली योजना, मुख्यमंत्री सौर कृषि पंप योजना, पूर्व विदर्भातील चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, भंडारा व नागपूर या ५ जिल्ह्याकरीता पूर्व विदर्भ योजना, रत्नागिरी जिल्ह्याकरीता कृषि पंप अनुशेष योजना व कृषि पंप वीज जोडणी धोरण - २०२० इत्यादी योजना राबविण्यात येत आहेत.

(२) उपरोक्त योजनांअंतर्गत शेतकऱ्यांनी पोल व ट्रान्सफॉर्मरचा खर्च करण्याची तरतूद नाही. तथापि, डेडीकेटेड डिस्ट्रीब्युशन फॅसिलीटी योजनेंतर्गत वीज जोडणी घेणाऱ्या शेतकऱ्यांना पोलचा तसेच ट्रान्सफॉर्मरचा खर्च करावा लागतो.

(३) राज्यामध्ये दिनांक ३१/०३/२०१८ अखेर पैसे भरुन प्रलंबित असलेल्या १,४१,१९६ कृषीपंपाना वीज जोडण्या देण्याकरीता उच्चदाब वितरण प्रणाली योजना (एच.व्हि.डी.एस.) मंजूर केली असून सदर योजना माहे ऑक्टोबर, २०१८ पासून राबविण्यात येत आहे. सदर योजनेंतर्गत ३१/०७/२०२२ अखेर एकूण १,३६,०६१ कृषीपंपाना वीज जोडणी देण्यात आली आहे.

तसेच शेतकऱ्यांना दिवसा सिंचनाची सोय उपलब्ध करुन देण्याच्या हेतूने शासनाने शासन निर्णय दिनांक १५/११/२०१८ अन्वये मुख्यमंत्री सौर कृषि पंप योजना जाहीर केली आहे. सदर योजनेंतर्गत जुलै, २०२२ अखेर १,००,००० सौर कृषि पंप आस्थापित करण्यात आले आहेत. तसेच दिनांक ०१/०४/२०१८ नंतर पैसे भरुन प्रलंबित असणाऱ्या कृषि पंप अर्जदारांकरीता कृषि पंप वीज जोडणी धोरण २०२० दिनांक १८/१२/२०२० च्या शासन निर्णयान्वये जाहीर करण्यात आले असून सदर धोरणांतर्गत ऑगस्ट, २०२२ अखेर १,७८,८९४ कृषि पंप वीज जोडण्या देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## विदर्भातील अकोला, यवतमाळ, बुलढाणा, अमरावती व नागपूर जिल्ह्यातील बेपत्ता झालेल्या मुलींचा शोध घेण्याबाबत

**(३) ४१२७ (१६-०७-२०२०) श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सुरेश धस, श्री.निलय नाईक :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: विदर्भातील अकोला, वाशिम, यवतमाळ, बुलढाणा, अमरावती व नागपूर या ६ जिल्ह्यातून ९२६ मुली बेपत्ता झाल्याचे दिनांक १३ मार्च, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बेपत्ता मुलींचा शोध घेण्यात आला आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बेपत्ता झालेल्या मुलींचा शोध घेऊन अपहरणकर्त्याला अटक करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१५-११-२०२२) :** (१), (२) व (३) विदर्भातील अकोला, वाशिम, यवतमाळ, बुलढाणा, अमरावती व नागपूर या सहा जिल्ह्यामध्ये २०२० मध्ये माहे मे, २०२० अखेर भादंवि कलम ३६३ अन्वये ३४४ मुली बेपत्ता झाल्याबाबत गुन्हे दाखल असून त्यापैकी २४१ मुली मिळून आल्या आहेत. सदर गुन्हयातील १२३ आरोपींना अटक करण्यात आली असून ९६ आरोपीविरुध्द दोषारोप पाठविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई शहरात झोपडपट्टी पुनर्वसन योजना (एस.आर.ए.) प्रभावीपणे राबविण्याबाबत

**(४) १०२५८ (०१-१०-२०२१) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १३ मधील प्रश्न क्रमांक ३१९४ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई येथील झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत (एसआरए) योजनेतील २,९६,९०८ सदनिका झोपडपट्टीधारकांना हस्तांतरित करण्यात आल्या नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत पूर्णगतीने पुनर्वसन योजना राबविण्यासाठी त्वरित उपाययोजना करण्याबाबतचा आराखडा शासनाने तयार केला आहे काय, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१६-११-२०२२) :** (१) हे खरे नाही.
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत २,३०,००० घरांना भोगवटा प्रमाणपत्र निर्गमित केले असून झोपडीधारकांचे पुनर्वसन केले आहे.
(२) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणातर्फे अशा रखडलेल्या झो.पु. योजनांना गती देण्याकरीता शासनाने धोरण निश्चित केले असून त्यानुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## गल्लेबोरगांव (ता.खुलताबाद, जि.औरंगाबाद) उपकेंद्रासाठी देवनाळा उपकेंद्रातून लाईन ओढण्याच्या कामाच्या अंदाजपत्रकास मान्यता देण्याबाबत

**(५) १०४६५ (०६-०१-२०२२) श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गल्लेबोरगांव (ता.खुलताबाद, जि.औरंगाबाद) येथील ३३ के.व्ही. उपकेंद्रासाठी कागजीपुरा या उपकेंद्रातून लाईन घेतलेली आहे. हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कागजीपुरा ते गल्लेबोरगांव हे अंतर १६ किमीचे असून वेरुळ व गल्लेबोरगांव या दोन्ही उपकेंद्रासाठी एकाच पोलवरुन लाईन घेतली असल्याने लाईन प्रमाण मोठ्या प्रमाणावर ट्रीप होत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, गल्लेबोरगांव ते देवनाळा (ता.कन्नड) हे अंतर फक्त ४ किमीचे असल्याने गल्लेबोरगांव उपकेंद्रासाठी देवनाळा उपकेंद्रातून लाईनचे काम करण्यासाठीचे अंदाजपत्रक मा.मुख्य अभियंता औरंगाबाद यांचेकडे सादर असून त्यावर अद्याप काहीही कार्यवाही झालेली नाही, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१०-११-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.

१३२ के.व्ही. कागजीपुरा येथून ३३ के.व्ही. गल्लेबोरगांव व ३३ के.व्ही. वेरुळ या उपकेंद्रांना विद्युत पुरवठा करण्यासाठी दोन ३३ के.व्ही. वाहिन्या अनुक्रमे २२ कि.मी. व १० कि.मी. अश्या आहेत व दोन्ही उपकेंद्रांना वेगवेगळया वाहिनीवर जोडण्यात आलेले आहे. सदर दोन्ही वाहिन्या या पूर्णपणे डोंगराळ व अभयारण्याच्या भागातून असल्यामुळे सिंगल पोल डबल सर्किट स्वरुपात उभ्या करण्यात आलेल्या आहेत. १३२ के. व्ही. कागजीपुरा येथून वेरुळ व गल्लेबोरगांवला येणाऱ्या वाहिन्या या जंगल व घाट परिसरातून जात असल्यामुळे पावसाळयात सदर वाहिन्यांवर बऱ्याच ट्रिपींग येतात. सदरील कोणत्याही एका वाहिन्यावर फॉल्ट निर्माण झाल्यास त्यावर काम करण्यासाठी दोन्ही ३३ के. व्ही. वाहिन्यांवर परमिट घ्यावे लागते. त्यावेळी दोन्ही उपकेंद्रांचा विद्युत पुरवठा खंडीत राहतो.
(३) हे खरे नाही.

३३/११ के.व्ही. गल्लेबोरगांव उपकेंद्र २२० केव्ही देवनाळा उपकेंद्रावरुन जोडण्यासाठी लागणाऱ्या १० कि.मी. वाहिनीचे १.६ कोटींचे काम RDSS योजनेत प्रस्तावित करण्यात आले आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ता.मुरुड, जि.रायगड येथील महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण महामंडळाच्या कामात गैरव्यवहार केल्याबाबत

**(६) १०८४१ (१९-११-२०२१) श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ता.मुरुड जि.रायगड येथील महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण महामंडळाच्या बोरली मांडला विभागातील सहाय्यक अभियंता याने सूरई येथील जुने पोल बदलण्याचे काम मंजूर असताना त्याऐवजी श्री.साईनाथ एकनाथ पाटील यांचे लाईन ट्रान्सफर चे काम पूर्ण केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मौजे भोईघर येथील श्रीमती पुष्पा नरेश बिरवाडकर यांचे सुद्धा जुने पोल बदलण्याचे काम मंजूर नसताना ते मंजूर आहे हे दर्शविण्यासाठी कागदपत्रांमध्ये फेरबदल करून प्रस्ताव तयार करुन काम पूर्ण केले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर दोन्ही प्रकरणी श्री.मंगेश पुरुषोत्तम थळे रा. काकलघर(ता.मुरुड, जि.रायगड) यांनी ११ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्या सुमारास अधीक्षक अभियंता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण महामंडळ पेण, जि.रायगड यांच्याकडे लेखी तक्रार करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१०-११-२०२२) :** (१) हे खरे नाही.

सुरई गावातील जुने जीर्ण पोल बदलणे हे काम मंजूर आहे व सदर जुने जीर्ण पोल काम श्री.साईनाथ एकनाथ पाटील यांच्या घराजवळ करण्यात आलेले आहे.
(२) हे खरे नाही.

श्रीमती पुष्पा नरेश बिरवाडकर यांचे जुने पोल बदलण्याचे कोणतेही प्रस्तावित काम नाही. त्यामुळे जुने पोल बदली करणे अथवा कागदपत्रांमध्ये फेरफार करुन प्रस्ताव तयार करणे ही बाब खरी नाही.
(३) हे खरे आहे.
(४) पेण मंडळ कार्यालयामार्फत कार्यकारी अभियंता, महावितरण, रोहा विभाग यांस तक्रारीची दखल घेऊन कारवाई करुन अहवाल सादर करण्याबाबत सुचित केले होते. तद्नुसार, सदर अहवाल पेण मंडळ कार्यालयास प्राप्त झाला. परंतु, हा अहवाल कोणत्याही निष्कर्षा विना फक्त संबंधितांचे जबाब घेऊन दिल्याने पुनश्च: पेण मंडळ कार्यालयामार्फत चौकशी करण्यात आली आहे. या अहवालानुसार काही किरकोळ त्रुटी आढळून आल्याने संबंधित शाखा अभियंता यांचा खुलासा मागविण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## विदर्भ व मराठवाड्यातील उद्योगांना देण्यात येणारी वीज सबसिडी सुरु करण्याबाबत

**(७) १०९७९ (१९-११-२०२१) श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.सुधीर तांबे, श्री.अभिजित वंजारी, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील वीज सबसिडीमुळे विदर्भ व मराठवाड्यांतील सूक्ष्म व लघू उद्योजकांनी उद्योग उभारले असून सदर उ्दयोगांना देण्यात येणारी वीज सबसिडी बंद केल्याने सदर उद्योग संकटात आल्याचे माहे ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विदर्भ इंडस्ट्रीज असोसिएशने सदरील वीज सबसिडी सुरु करण्याची मागणी केली आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विदर्भ इंडस्ट्रीज असोसिएशने वीज सबसिडी सुरु करण्याबाबतची केलेली मागणी पूर्ण करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१५-११-२०२२) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
(३) विदर्भ व मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र डी व डी + क्षेत्रातील औद्योगिक ग्राहकांना माहे मे, २०२१ ची वीज दर सवलत माहे ऑगस्ट, २०२१ च्या वीज देयकात देण्यात आली आहे. तद्नंतर माहे जून, २०२१ व जुलै, २०२१ व ऑगस्ट, २०२१ ची सवलत अनुक्रमे सप्टेंबर, २०२१, ऑक्टोबर, २०२१ व नोव्हेंबर, २०२१ च्या वीज देयकात देण्यात आली आहे. तसेच माहे सप्टेंबर, २०२१ ची सवलत मार्च, २०२२ मध्ये व ऑक्टोबर, २०२१ ची सवलत मे, २०२२ मध्ये देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## प्रबोधनकार ठाकरे नगर (चारकोप) येथील सहकारी गृहनिर्माण संस्थांना म्हाडा प्राधिकरणाकडून भरमसाठ दंड आकारण्यात येत असल्याबाबत

**(८) ११७४० (२९-०६-२०२२) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) प्रबोधनकार ठाकरे नगर (चारकोप) येथील म्हाडा वसाहतीमधील सहकारी गृहनिर्माण संस्थांना बिनशेतीसारा आणि भुई भाडे यांवर म्हाडा प्राधिकरणाकडून भरमसाठ दंड आकारण्यात येत असल्याची बाब दिनांक १ डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, त्यानुषंगाने सदर गृहनिर्माण संस्थेतील रहिवाशी अल्प उत्पन्न गटातील असल्याने भरमसाठ दंडाच्या रकमेत सवलत देण्याबाबत कोणता धोरणात्मक निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१६-११-२०२२) :** (१), (२) व (३) जागतिक बँक प्रकल्पांतर्गत चारकोप येथील (सेक्टर १ ते ९) येथील सहकारी संस्थांना ९० वर्षाच्या भाडेपट्टा करारनाम्यावर मोकळया भूखंडाचे वाटप करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार करण्यात आले आहे. सदरहू गृहनिर्माण संस्थेतील अल्प उत्पन्नधारकास वार्षिक रुपये १२ इतके नाममात्र भुईभाडे आकारण्यात येते आणि बिनशेतीसाऱ्याची आकारणी ही शासनाने वेळोवेळी ठरविलेल्या दरानुसार आकारण्यात येते.

---

## कृष्णा व तापी खोऱ्यातील उपसा जलसिंचन योजनेबाबत

**(९) १२२१५ (३०-०३-२०२२) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृष्णा व तापी खोऱ्यातील उपसा जलसिंचन योजना शासनाने अधिग्रहित केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गोदावरी खोऱ्यातील किती उपसा जलसिंचन योजना शासनाने अधिग्रहीत केल्या आहेत,

(३) असल्यास, सन १९९१ ते ९५ मध्ये कार्यान्वित झालेली श्री रामकृष्ण गोदावरी सहकारी उपसा जलसिंचन योजना जायकवाडी धरणाच्या पाण्यावर पिण्याच्या पाण्याचे आरक्षण टाकल्यामुळे बंद पडली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी गोदावरी खोऱ्यातील उपसा जलसिंचन योजना शासन अधिग्रहित करणार आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची वा अधिग्रहित न करण्याची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१५-११-२०२२) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

तापी खोऱ्यातील काही उपसा जलसिंचन योजना शासनाने अधिग्रहित केल्या आहेत.

(२) एकही नाही.

(३) हे खरे नाही. श्री रामकृष्ण गोदावरी सहकारी उपसा जलसिंचन योजना ही, "दिनांक औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., औरंगाबाद" यांची असून, त्याकरिता जायकवाडी जलाशयावरील पाणी आरक्षण मंजूर आहे. योजनेवरील बँकेचे कर्ज, विद्युत पुरवठा देयकाची थकबाकी, जलसंपदा विभागाची पाणीपट्टी थकबाकी न भरल्यामुळे व बँकेच्या कर्जाचा बोजा संस्थेच्या लाभधारक शेतकऱ्यांच्या ७/१२ वर टाकणे इत्यादी कारणांमुळे ही योजना बंद आहे.

(४) दिनांक २ मे, २०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार सदरील योजना पुन:श्च कार्यान्वित करण्यासाठी शासनाने रक्कम रुपये ५.७९ कोटी इतका निधी दि औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. औरंगाबाद बँकेस उपलब्ध करणेबाबत आदेशित केलेले आहे. त्यानुसार कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर शहरातील प्रकल्पग्रस्त वसाहतीत मूलभूत सोयीसुविधा उपलब्ध करून देणेबाबत

**(१०) १३२५५ (१६-०९-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील प्रकल्पग्रस्त झोपडपट्टीवासीयांसाठी पुनर्वसन प्राधिकरणातर्फे बहुमजली इमारती उभारुन गाळे देवून प्रकल्पधारकांचे पुनर्वसन करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बहुमजली इमारतीमध्ये अद्यापही ५० टक्के गाळे रिकामे असून काही गाळे गाळेधारकांनी ताब्यात घेतले असून आवश्यक मूलभूत सोयीअभावी नागरिकांची (पुनर्वसनधारकांची) गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, झोपडपट्टीवासीयांचे पुनर्वसन करतांना शासनाच्या पुनर्वसन धोरणाचे उल्लंघन करण्यात येवून जाणीवपूर्वक सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पुनर्वसनधारकांना मूलभूत सुविधा उपलब्ध करुन देवून पुनर्वसनधारकांना हक्काची घरे व न्याय मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१६-११-२०२२) :** (१) बिएसयुपी अंतर्गत बांधण्यात आलेल्या सदनिकांचे वाटप करून झोपडीधारकाचे पुनर्वसन करण्यात आले आहे.
(२) बहुमजली इमारतीमध्ये आतापर्यंत ९७.५०% टक्के गाळे वाटप करण्यात आले आहे व उर्वरीत गाळे वाटप करण्याच्या प्रक्रियेत आहे. मूलभूत सोयी अभावी नागरीकांची गैरसोय होत आहे ही बाब अंशत: खरी आहे.
(३) पुनर्वसन करतांना बांधण्यात आलेल्या बहुमजली इमारतीमध्ये संपूर्ण सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या होत्या परंतु आता त्याचे देखभाल व दुरुस्तीकरण करणे आवश्यक आहे.
(४) दिलेली सोयी सुविधाची देखभाल दुरुस्ती करण्याची जबाबदारी गाळे धारकांद्वारे समिती गठीत करुन करावयाची आहे. गृहनिर्माण संस्थेची नोंदणी करणे बाबत कार्यालयामार्फत लाभार्थ्यांची बैठक घेऊन नोंदणी बाबत कळविण्यात आले, परंतु लाभार्थ्यांद्वारे याकरिता प्रतिसाद मिळत नसल्यामुळे सदर प्रक्रिया प्रलंबित आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## तेर्से बांबर्डे (ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग) येथील वाड्यांमध्ये नवीन विद्युत ट्रान्सफार्मर बसविण्याबाबत

**(११) १३३४४ (३०-०३-२०२२) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तेर्से बांबर्डे (ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग) येथील खरूडेवाडी, मरगळवाडी, आंबेरकरवाडी, कोपरगावकरवाडी, वेंगुर्लेकरवाडी इत्यादी वाड्यांना अनेक वर्षापासून अत्यंत कमी दाबाचा विद्युत पुरवठा होत असून महावितरण कंपनीतील पूर्वीचे ट्रान्सफार्मर सद्य:स्थितीत कालबाहय झाले असल्यामुळे संपूर्ण गावातील वीज वापराचा भार सदर ट्रान्सफार्मरवर येत असून सदरहू वाडीतील वीज ग्राहकांना कमी दाबाचा वीजपुरवठा होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अखंडीत अंधूक वीज पुरवठ्यामुळे सदर वाड्यातील नागरिकांना तसेच विद्यार्थ्यांना अडचणींना सामोरे जावे लागत असून तेर्से बांबर्डे गावासाठी नवीन विद्युत ट्रान्सफार्मर बसविण्यात यावा, अशी मागणी तेथील ग्रामस्थांनी गत दोन वर्षापासून कार्यकारी अभियंता, महावितरण कंपनी, कुडाळ, मा.ऊर्जामंत्री, मा.पालकमंत्री, सिंधुदुर्ग जिल्हा आदीकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महावितरण कंपनीकडून याप्रकरणी कोणतीही कारवाई केली गेली नसल्यामुळे दिनांक ३ फेब्रुवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास महावितरण कंपनीने उपअभियंता, श्री.कांबळे यांना कुडाळ येथील कार्यालयात प्रत्यक्ष भेट घेऊन निवेदन दिलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने तेर्से बाबर्डे गावांतील वाड्यांमध्ये तातडीने नवीन विद्युत ट्रान्सफार्मर बसविण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (११-११-२०२२) :** (१) हे अंशत: खरे आहे. तेर्से बांबर्डे (ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग) येथील खरुडेवाडी, मरगळवाडी, आबेरंकरवाडी, कोपरगावकरवाडी, वेंगुर्लेकरवाडी व इतर वाड्यांचा वीज पुरवठा तेथे अस्तित्वात असलेल्या "कलम" नावाचे १०० केव्हीए चे क्षमतेचे ट्रान्सफॉर्मर क्रमांक १ वरुन केला जात होता. माहे ऑगस्ट २०२० मध्ये दीनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजनेंतर्गत नवीन १०० केव्हीए क्षमतेचे ट्रान्सफॉर्मर साटेलकरवाडी येथे कार्यान्वित करुन सदर गावातील विद्युत लोडची विभागणी करण्यात आली. सबब सदर कामकाजानंतर वरील वाड्यांकरीता कमी दाबाचा विद्युत पुरवठ्याचा प्रश्न निकाली निघाला आहे.
(२) हे अंशत: खरे आहे. महावितरणच्या विभागीय कार्यालयास बांबर्डे ग्रामस्थांचे लेखी निवेदन दिनांक १८/०२/२०२२ रोजी प्राप्त झाले आहे. तसेच, दिनांक १८/०१/२०२२ रोजीचे मा.खासदार श्री.विनायक राऊत यांचे मौजे तेर्से बांबर्डे, ता.कुडाळ कोरगावकरवाडी, खरुडेवाडी, मडगळवाडी, चव्हाणवाडी येथे नवीन वितरण रोहित्र बसविणेबाबतचे पत्र महावितरणच्या सिंधुदुर्ग मंडळ कार्यालयास प्राप्त झाले आहे.
(३) हे अंशत: खरे आहे. दिनांक ३ फेब्रुवारी, २०२२ रोजीचे तेर्से बांबर्डे येथील ग्रामस्थांचे निवेदन महावितरण कंपनीच्या कुडाळ विभागीय कार्यालयास दिनांक १८/०२/२०२२ रोजी प्राप्त झाले आहे.
(४) सदर प्रकरणी तपासणी केली असता, खरुडेवाडी, मरगळवाडी, आंबेरकरवाडी, कोपरगावकरवाडी, वेंगुर्लेकरवाडी येथे कमी दाबाचा विद्युत पुरवठा होत नाही. तेर्से बांबर्डे ग्रामपंचायत अंतर्गत एकूण १५ वाड्यांचा समावेश होत असून याकरीता एकूण ४ रोहित्रांच्या माध्यमातून वीज पुरवठा होत आहे. सबब, सदर गावातील लघुदाब वाहिनीचे अंतर कमी करण्याकरीता तसेच भविष्यात येणाऱ्या नवीन वीज जोडण्या तसेच विद्युत पुरवठ्याची गुणवत्ता सुधार व तक्रारींचे निवारण करण्याच्या दृष्टीने मा.खासदार श्री.विनायक राऊत यांच्या मागणीप्रमाणे नवीन १०० केव्हीए क्षमतेचे रोहीत्र व लागणारे विद्युत वाहिनीचे अंदाजपत्रक जिल्हा नियोजन समितीकडे प्रशासकीय मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहे. जिल्हा नियोजन समितीच्या प्रशासकीय मंजूरी व निधि उपलब्धतेनंतर नविन ट्रान्सफॉर्मर (वितरण रोहित्र) उभारण्याची प्रक्रिया प्राधान्याने करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जाम प्रकल्पांतर्गत (जि.नागपूर) पाटबंधारे उपविभाग काटोल क्षेत्रातील शेतकरी सिंचनाच्या पाण्यापासून वंचित राहत असल्याबाबत

**(१२) १३४७४ (१३-०४-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.अभिजित वंजारी, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जाम प्रकल्पांतर्गत (जि.नागपूर) पाटबंधारे उपविभाग काटोल क्षेत्रातील कालवे व उपकालवे यामधील झाडे झुडपे सफाई कामावर दरवर्षी लाखो रूपये खर्च होऊनही शेवटच्या शेतकऱ्यांपर्यंत पाणी पोहचत नसून तसेच ऐन हंगामाच्या काळात सफाईचे काम सुरू राहात असल्याने हे कालवे बंद राहील्याने शेतकरी सिंचनाच्या पाण्यापासून वंचित राहत असल्याच्या तक्रारी परिसरातील शेतकरी व लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने जाम प्रकल्पांतर्गत पाटबंधारे उपविभाग काटोल क्षेत्रातील कालवे व उपकालवे यामधील पाणी शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (११-११-२०२२) :** (१) व (२) हे खरे नाही. जाम प्रकल्पाच्या कालवे व उपकालवे यामधील झाडे झुडपे सफाई कामे पाखरण कार्यक्रमाअंतर्गत यांत्रिकी विभागामार्फत सिंचन हंगाम सुरू होण्यापूर्वी करण्यात येतात. आपत्कालीन स्थिती वगळता सिंचन हंगामाच्या कालावधीत कालवे सफाईचे काम करण्यात येत नाही. या कामांवर कुठलाही अनावश्यक खर्च करण्यात येत नाही.

प्रकल्पातुन सिंचनासाठी रब्बी हंगामामध्ये पाणी सोडण्यात येते. प्रकल्पाच्या पुच्छ भागातून (तसेच संपूर्ण लाभक्षेत्रातून) शेतकऱ्याच्या मागणी नुसार सर्वांना सिंचनाकरिता पाणी उपलब्ध करून देण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लोहा (जि.नांदेड) नगरपरिषदेने महावितरणवर कारवाई केल्याबाबत

**(१३) १४११६ (२५-०८-२०२२) श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लोहा (जि.नांदेड) नगरपरिषदेने वीज बील थकविल्यामुळे महावितरणने नगरपरिषदेचे पाणीपुरवठा व पथदिव्यांच्या वीज पुरवठा खंडीत केला असल्याचे दिनांक १ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे लोहा नगरपरिषदेने महावितरणच्या लोहा उपविभागीय कार्यालयाचा मालमत्ता कर थकीत असल्याचे कारण देऊन सदर कार्यालय सील केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नागरिकांची होणारी गैरसोय दूर करण्याकरीता लोहा नगरपरिषद व महावितरण कार्यालयांनी त्यांच्याकडे असलेली थकबाकी भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१७-११-२०२२) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) नगरपरिषदेने सुनेगाव पाणीपुरवठा योजना व जलशुद्धीकरण केंद्र येथील विद्युत देयक पूर्ण भरणा केले असल्यामुळे शहरातील नागरिकांना पाणीपुरवठा सुरळीत होता. तसेच इतर विंधन विहिरी व पथदिवे इत्यादींचे देयक हे निधी उपलब्धतेनुसार वेळोवेळी भरणा करण्यात येतो.

तसेच महावितरण कार्यालयाने रुपये ८३,७५,६८२/- इतक्या मालमत्ता कराच्या थकीत रकमेपैकी रुपये ५,७३,९२४/- एवढी रक्कम भरणा केली असून, उर्वरित थकीत रक्कम भरणा करण्याची कार्यवाही महावितरण कार्यालयाकडून सुरु आहे.

सद्य:स्थितीत नगरपरिषदेचा वीजपुरवठा सुरळीत सुरु असून, महावितरण कार्यालयाचे सिल नगरपरिषदेने उघडले असल्याबाबत जिल्हाधिकारी, नांदेड यांनी अहवाल सादर केला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना/ राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना खाते धारकांना सहाव्या वेतन आयोगाची थकबाकी मिळण्याबाबत

**(१४) १४३७८ (२५-०८-२०२२) श्री.किरण सरनाईक :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना (डी.सी.पी.एस)/ राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना (एन.पी.एस.) खाते धारक कर्मचाऱ्यांनी सहाव्या वेतन आयोगाची थकबाकी मिळणेबाबतची मागणी केली असल्याची बाब माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन, चौकशीच्या अनुषंगाने परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना (डी.सी.पी.एस)/ राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना (एन.पी.एस.) खाते धारकांना सहाव्या वेतन आयोगाची थकबाकी मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (११-११-२०२२) :** (१) नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.

परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना (डी.सी.पी.एस)/राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजना (एन.पी.एस.) लागू असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांना सहाव्या वेतन आयोगाच्या स्तर–II मधील जमा थकबाकीच्या रकमा व्याजासह प्रदान करण्याबाबतचा शासन निर्णय दिनांक ०८/१०/२०२१ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बोकडविरा (ता.उरण, जि.रायगड) सिडको कार्यालयाजवळचा निकामी झालेला बॉक्स कल्व्हर्ट दुरुस्ती करणेबाबत

**(१५) १४४३० (२५-०८-२०२२) श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बोकडविरा (ता.उरण, जि.रायगड) गावाजवळील द्रोणगिरी सिडको कार्यालयाजवळ असलेला सिडकोने बनविलेला बॉक्स कल्व्हर्ट निकामी झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याच नाल्यावरील फुंडे गावाजवळील बॉक्स कलव्हर्ट कोसळून दिपक सूरकर या तरुणाचा दिनांक १४ मार्च, २०२१ रोजी मृत्यू झाला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बोकडविरा सिडको कार्यालयाजवळचा निकामी झालेला बॉक्स कल्व्हर्ट दुरुस्ती करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१७-११-२०२२) :** (१) हे खरे नाही, बोकडवीरा (ता.उरण, जि.रायगड) गावाजवळ असलेला बॉक्स कल्व्हर्ट कमकुवत झाल्याने जड वाहनांच्या वाहतुकीस बंद करण्यात आलेला आहे.
(२) हे खरे नाही, फुंडे गावाजवळील पुल व द्रोणागिरी सिडको कार्यालयाजवळील बॉक्स कल्व्हर्ट हे वेगवेगळया ठिकाणी असून दिनांक १४/०४/२०२१ रोजी फुंडे गावाजवळील नाल्यावर असलेल्या लहान पुलाचा एक भाग कोसळून तरुणाचा मृत्यू झाला आहे. सिडकोमार्फत सदर पुलाच्या दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले आहे.
(३) सदर प्रकरणी सिडकोमार्फत समिती गठीत करुन चौकशी करण्यात आली असून सदर समितीने फुंडे गावाजवळील नाल्यावर बसलेल्या लहान पुलाची पुर्नबांधणी करण्याचे प्रस्तावित केले आहे.
तसेच उक्त बॉक्स कल्व्हर्ट संरचनात्मक ऑडीट करुन आयआयटी मुंबईने सादर केलेल्या अहवालानुसार बॉक्स कल्व्हर्टची दुरुस्ती व मजबुतीकरण करण्याचे काम सिडकोमार्फत प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वेरुळ येथील बारावे ज्योतिलिंग श्री घृणेश्वर मंदिर विकास आराखड्याची कामे निधी अभावी प्रलंबित असल्याबाबत

**(१६) १४७६७ (२५-०८-२०२२) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने वेरुळ येथील बारावे ज्योतिर्लिंग श्री घृणेश्वर मंदिर विकास आराखड्यातील कामांकरीता दिनांक ३१ मार्च, २०२३ रोजीपर्यंत मुदतवाढ दिली असून प्रादेशिक पर्यटन विकास योजनेत मिळालेला पाच कोटी रुपयांचा निधी विनावापर पडून राहिल्याने परत गेला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निधी परत गेल्यामुळे मंदिराच्या विकास आराखड्याचे काम प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर निधी परत जाण्यास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची काणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (११-११-२०२२) :** (१) हे खरे नाही, सदर निधी हा प्रादेशिक पर्यटन विकास योजनेंतर्गत वितरीत करण्यात आलेला नाही.

"श्री घृष्णेश्वर, वेरुळ, तालुका खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद विकास आराखड्यास" दिनांक ३१ मार्च, २०२३ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

श्री क्षेत्र घृष्णेश्वर मंदिर विकास आराखड्यातील कामांकरीता नियोजन विभाग, शासन निर्णय दिनांक १६ मार्च, २०२२ अन्वये रुपये ५.०० कोटी निधी वितरीत केला असून, सदर निधी कार्यकारी अभियंता जागतिक बँक प्रकल्प विभाग, औरंगाबाद यांना "श्री क्षेत्र घृष्णेश्वर मंदिर विकास आराखड्या"तील कामांकरीता वितरीत करण्यात आला होता. तथापि, तांत्रिक अडचणींमुळे सदर निधी क्षेत्रिय स्तरावर आहरित करता आला नाही. सबब, निधी समर्पित करण्यात आला.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून घेण्यात आलेल्या सहायक आयुक्त (वॉर्ड ऑफिसर) बृहन्मुंबई महानगरपालिका, वरिष्ठ सेवा गट-अ या पदांच्या परीक्षा पुन:श्च घेण्याबाबत

**(१७) १४८७८ (२५-०८-२०२२) श्री.रामराव पाटील, श्री.सुरेश धस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सहायक आयुक्त (वॉर्ड ऑफिसर) बृहन्मुंबई महानगरपालिका, वरिष्ठ सेवा गट-अ या १६ पदांच्या पदांकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून जाहिरात देण्यात आलेल्या जाहिरातीत आर्थिक दुर्बल घटकांकरीता असणारी ५ वर्षे वयोमर्यादेची अट नमूद नसल्याने वय वर्षे ४० ते ४५ वयोगटातील अधिकारी/ उमेदवारांना परीक्षेपासून वंचित रहावे लागले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापूर्वीही महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून जाहिरात देण्यात आलेल्या राज्यसेवा पूर्व परीक्षा-२०२१ व अवर सचिव (विधी) गट-अ या जाहिरातीमध्ये सुध्दा आयोगाकडून मूळ जाहिरातीमध्ये आर्थिक दुर्बल घटकांकरीता वयोमर्यादा शिथिल करण्यात आली नव्हती, परंतु सदर जाहिरातीमध्ये शुध्दीपत्रक काढून आर्थिक दुर्बल घटकांमधील उमेदवारांकरीता ५ वर्षे वयाची वयोमर्यादा शिथिल करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२१ रोजी झालेल्या सदरील परीक्षेमध्ये ४३/१०० प्रश्नांबाबत अधिकारी/ उमेदवारांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे आक्षेप नोंदविलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून घेण्यात आलेल्या सहायक आयुक्त (वॉर्ड ऑफिसर) बृहन्मुंबई महानगरपालिका, वरिष्ठ सेवा गट-अ या पदांच्या परीक्षा पुन:श्च घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२१-११-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) अंशत: खरे आहे.

(४) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने उत्तरतालिका प्रसिध्द केल्यानंतर एकूण १०० पैकी ६४ प्रश्नांवर उमेदवारांच्या तक्रारी आयोगास प्राप्त झाल्या. सदर तक्रारी विषयाच्या मूळ तज्ज्ञांकडे अभिप्रायार्थ पाठविण्यात आल्या. तज्ज्ञांचे अभिप्राय आयोगाने विचारात घेऊन उत्तरतालिका सुधारित करुन अंतिम

उत्तरतालिका प्रसिध्द केली. अंतिम उत्तरतालिकेत प्रश्न क्र. २३, ३४, ५५, ६९ व ९९ हे प्रश्न रद्द करण्यात आले. तसेच प्रश्न क्र. ९६ या प्रश्नाच्या उत्तराचा पर्याय बदलण्यात आला. त्या अनुषंगाने अंतिम उत्तरतालिका दिनांक १७/१२/२०२१ रोजी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली. सदर पदाच्या चाळणी परीक्षेचा निकाल आयोगाकडून दिनांक २३/०३/२०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आला. त्यामुळे परीक्षा पुनश्च: घेण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात स्पर्धा परीक्षांसाठी आदर्श परीक्षा संहिता करण्याबाबत

**(१८) १४९६० (२५-०८-२०२२) श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाच्या पदे भरतीच्या जाहिरात निघाल्या नंतरही वर्षानुवर्षे भरती प्रकिया रखडते, सदरहू प्रकार टाळण्यासाठी आणि कालबध्द परीक्षा प्रकिया राबविण्यासाठी आदर्श परीक्षा संहिता निर्माण करण्यात यावी, अशी मागणी एम.पी.एस.सी. समन्वय समितीने शासनास माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागणीवर शासनाने निर्णय घेऊन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२१-११-२०२२) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईसह राज्यातील सन २०११ पर्यंतच्या झोपड्यांना संरक्षण देण्याच्या निर्णयाबाबत

**(१९) ३९७४४ (०६-०४-२०१८) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईसह राज्यातील सन २०११ पर्यंतच्या झोपड्यांना संरक्षण देऊन त्यांचा पुनर्विकास करण्याच्या निर्णयाच्या अनुषंगाने कार्यवाही सुरु करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात सन २०११ पर्यंत किती झोपड्या असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे व उक्त निर्णयानुसार मुंबईसह राज्यातील किती झोपड्यांना संरक्षण मिळणार आहे,
(३) असल्यास, सन २००० पर्यंतच्या झोपड्यांना शासनाने अधिकृत केल्याने प्रकल्प बाधितांची संख्या वाढल्याने मुंबईतील प्रकल्पग्रस्तांसाठी सदनिकांचा तुटवडा निर्माण झाल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास शासनाने सन २०११ पर्यंतच्या झोपड्यांना संरक्षण देण्याचे धोरण अवलंबविलेले असल्याने अनेक परप्रांतीय अधिकृत होणार असून त्यामुळे राज्याचे नुकसान होणार असून परिणामी जनतेचे नुकसान होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१६-११-२०२२) :** (१) हे खरे आहे.

(२) सन २०११ पर्यंतच्या झोपड्यांबाबत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत सर्वेक्षण करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील घरांच्या किमती म्हाडा प्रशासनाने कमी करण्याचा निर्णय घेतल्याबाबत

**(२०) ४७०२४ (०६-०७-२०१९) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अनिकेत तटकरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, ठाणे तसेच विस्तारीत उपनगर येथे सन २०१८ अखेर सव्वा दोन लाख घरे विक्रीविना रिक्त असल्याचे निर्दशनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील घरांच्या किंमती म्हाडा प्रशासनाने कमी करण्याचा निर्णय घेतला असून म्हाडाच्या धर्तीवर सिडकोच्या घरांच्या किंमती कमी करण्याबाबत शासन निर्णय घेणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच राज्यात नव्याने विकसित होणाऱ्या भागामध्ये काही घरे ही स्वस्त असलीच पाहिजेत असा नियम बनविण्याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच सिडकोची किती घरे विना विक्री आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१६-११-२०२२) :** (१) अशी बाब विभागाच्या निदर्शनास आली नाही.

(२) व (३) सन २०१९ मध्ये सिडको महामंडळाच्या चालू असलेल्या स्वप्नपूर्ती गृहनिर्माण योजनेतील अल्प उत्पन्न गट व आर्थिकदृष्ट्या उत्पन्न घटक या प्रवर्गातील ८१४ इतकी घरे विनाविक्री होती, परंतु याकरीता कार्यान्वित करून अर्ज मागविण्यात आले आहेत. या योजनेस भरघोस प्रतिसाद लाभला असून, २८०८० इतके अर्ज प्राप्त झाले आहेत व यावर पुढील सोडतीची प्रक्रिया पार पाडून वाटप करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.